सकाळ



**गडहिंग्लज : रवळनाथ सोसायटी व झेप अ‍ॅकॅडमीतर्फे झालेल्या कार्यक्रमात बोलताना गणेश इंगळे. व्यासपीठावर डॉ. बी. एस. पाटील, डॉ. दत्ता पाटील, राजेंद्र तेली, एम. एल. चौगुले, प्रा. व्ही. के. मायदेव.**

# संकटांनाच संधी माना

## उपअधीक्षक इंगळे; गडहिंग्लजला 'रवळनाथ-झेप'तर्फे कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**

गडहिंग्लज, ता. १५ : कोरोनामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत; परंतु त्यावर जिद्दीने मात करता येते. तरुणांनी डगमगून जाऊ नये. स्वतःवर विश्वास ठेवून नियोजनपूर्वक अभ्यास करावा. संकटांना संधी मानून मनापासून प्रयत्न करावा. यश तुमचेच असेल, असा विश्वास पोलिस उपअधीक्षक गणेश इंगळे यांनी दिला.

येथील रवळनाथ हौसिंग फायनान्स सोसायटी व झेप अ‍ॅकॅडमीतर्फे सत्काराचा कार्यक्रम झाला. याप्रसंगी इंगळे बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते. दरम्यान, सांगली महापालिकेचे निवृत्त उपायुक्त राजेंद्र तेली, तसेच रेल्वेत तंत्रज्ञपदी निवड झालेला झेपचा विद्यार्थी वैभव जाधव यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

तेली म्हणाले, "माहिती तंत्रज्ञानामुळे अभ्यासाची साधने उपलब्ध झाली आहेत. त्याचा योग्य उपयोग करावा. स्वतः नोटस् काढून स्पर्धा परीक्षांची तयारी करावी. अधिकारी बनल्यानंतर केवळ खुर्चीत न बसता झोकून देऊन काम करावे." चौगुले म्हणाले, "झेप अ‍ॅकॅडमीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. भविष्यात वयोवृद्ध नागरिकांसाठी वृद्धाश्रम सुरू करण्याचा मानस आहे."

ज्ञानदीप प्रबोधिनीचे कार्याध्यक्ष डॉ. दत्ता पाटील यांनी स्वागत केले. रवळनाथचे उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, झेपचे उपाध्यक्ष डॉ. बी. एस. पाटील, महेश मजती, प्रदीप अभ्यंकर, नंदकुमार शेळके, डॉ. आर. एस. निळपणकर, डॉ. संजय चौगुले, रंगा शिंगटे, रशिदा शेख, डॉ. सुभाष पाटील, विजय आरबोळे, बसाप्पा आरबोळे, रामकुमार सावंत, बाबासाहेब आजरी, बसवराज रिंगणे, श्रीकांत जाधव, एस. आर. कांबळे आदी उपस्थित होते. झेपच्या प्राचार्या मीना रिंगणे यांनी सूत्रसंचालन केले. सचिव संदीप कागवाडे यांनी आभार मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
16/11/2020 Page No. 3